दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
VADAL VARTA
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● शनिवार १३एप्रिल २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २४० ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# अवकाळीचा फटका अजून तीन दिवस, आयएमडी ने सांगितले कधीपर्यंत असणार पाऊस



**वादळवार्ता/ शिरूरकासार**
राज्यात एप्रिल महिन्यात अनेक भागांत अवकाळी पाऊस आणि गारपीट सुरु आहे. या पावसामुळे शेतकरी चांगलाच अडचणीत आला आहे. प्रशासन अन् शासन लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत असताना शेतमालाचे नुकसान होत आहे. यामुळे नुकसानीचे पंचनामे कधी होणार असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर आला. अवकाळी पावसाचे संकट अजूनही कायम असणार आहे. राज्यात 13 ते 15 एप्रिल या तीन दिवसांत अवकाळी पाऊस पडणार असल्याचा इशारा भारतीय हवामान विभागाने दिला आहे. देशातील अनेक राज्यांमध्ये अवकाळी पावसाचा इशारा दिला आहे. काय आहे आयएमडीचा इशारा 13 एप्रिल रोजी मध्य भारतात हलका ते मध्यम पाऊस होणार आहे. या वेळी वादळी वारा आणि गारपीटीचा अंदाज आहे. 13 आणि 14 एप्रिल रोजी मध्य प्रदेश, छत्तीसगड, विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्रात मुसळधार पाऊस होण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. विजांच्या कडकडाटासह हा पाऊस होणार आहे. यामुळे राज्यात गेल्या आठवड्याच्या अखेरपासून सुरू झालेली अवकाळी पावसाचा मारा अजूनही कायम राहणार आहे. येत्या 15 एप्रिलपर्यंत अवकाळी पावसाचे संकट कायम राहणार आहे. राज्यातील अनेक भागांत आज रेड अन् ऑरेंज अलर्ट दिला आहे. नागपुरात सलग तिसऱ्या दिवशी पाऊस

सलग तिसऱ्या दिवशी पहाटेपासून नागपूरात अवकाळी पाऊस झाला. आज पूर्व आणि पश्चिम विदर्भातील सर्वच जिल्ह्यात पावसाचा येलो अलर्ट दिला आहे. आज पहाटेपासून विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस सुरु झाला आहे. मागील दोन दिवस ऑरेंज अलर्ट दिला होता. आता त्या तुलनेत पावसाचा जोर अधिक आहे. विदर्भात एकीकडे पहिल्या टप्प्यात लोकसभा निवडणुकीत प्रचाराला वेग आला असताना त्यावरही पावसाचा फटका बसत आहे. वाशिममध्ये पाऊस

वाशिममधील शिरपूर व परिसरातील जोरदार पाऊस पडला. मागील तीन दिवसांत परिसरात दोन वेळा जोरदार पाऊस झाला. या पावसामुळे नाले पूर्णपणे ओसंडून वाहत आहेत. पावसाने शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. हळद उत्पादक शेतकऱ्यांचे ढगाळ वातावरणामुळे नुकसान झाले आहे. जालना जिल्ह्यातील मंठा तालुक्यासह विदर्भ सीमेवर अनेक भागात अवकाळी पाऊस झाला. मंठा तालुक्यतील उस्वद गावात वादळी वारा आणि वादळी वाऱ्यामुळे गावातील शाळा आणि घरावरची पत्रे उडून गेली. अचानक झालेल्या या पावसामुळे फळबागेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

## सावरगाव ग्रामपंचायतच्या चुकीच्या नियोजनामुळे ग्रामस्थांचे आरोग्य आले धोक्यात.

**वादळवार्ता/वडवणी**
माजलगाव( प्रतिनिधी) तालुक्यांतील सावरगाव येथील ग्रामपंचायतच्या चुकीच्या नियोजनामुळे ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहे. येथील गावकऱ्यांनी पंचायत समिती कार्यालय माजलगाव येथे अभिमन्यू जगताप यांनी निवेदनाद्वारे तक्रार दाखल केली आहे. सावरगाव हे साधारणतः चार हजार लोकसंख्या असलेले गाव आहे. सावरगाव अंतर्गत मुख्य रस्ता आहे .या मुख्य रस्त्याच्या एका बाजूला व दुसऱ्या बाजूला हजारो लोक राहतात. मात्र पश्चिम कडून पूर्व दिशेला जाणारे सांड पाणी मुख्य रस्त्या लगत साचले जात आहे. याचे कारण ही तसेच आहे. सावरगाव ग्रामपंचायतनी मुख्य रस्त्या खाली मोठे पाईप न टाकता. ग्रामस्थांच्या राहत्या घराकडे सांड पाणी वळवण्यात आले. यामुळे या सांड पाण्यावर मच्छरांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. यामुळे लहान मुले तरुण, वयोवृद, लोकांना ताप येण्यासारखे आजार जडत आहेत. सदरील नाला गत 35 वर्षांपासून सुरुळीत सुरु होता.मात्र सावरगाव ग्रामपंचायत नी तो नाला बंद केल्याने नाहक नागरिकांना याचा त्रास भोगावा लागत आहे. या संदर्भात ग्रामसेवक यांना लेखी तक्रार देऊन देखील त्यांच्या कडून कानाडोळा केला जात आहे.या सांड पाण्याची विल्हेवाट न लावल्यास पंचायत समिती समोर आमर उपोषण करण्याचे ईशारा तक्रारदार अभिमन्यू जगताप यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

## गीतांजली वाणी शुभंकरोती राज्य स्तरीय समर्थ नारी पुरस्काराने सन्मानित



**वादळवार्ता**
शुभंकरोती साहित्य परिवार (संस्थापिका सौ. सोनाली जगताप) व नेशनल लायब्ररी बांद्रे (कार्यवाह प्रमोद महाडिक) यांच्या संयुक्त विद्यमाने दुपारी ३.३० वाजता राज्यस्तरीय समर्थ नारी सन्मान सोहळ्याच आयोजन करण्यात आलं होते . कार्यक्रमाचे अध्यक्षपद ज्येष्ठ साहित्यिक माननीय चंद्रकांतजी दादा वानखेडे यांनी भूषविले तथा उदघाटन सौ. हेमांगी नेरकर यांच्याहस्ते झाले.यावेळी तारक मेहता का उलटा चष्मा फेम सोनालिका जोशी (कुलकर्णी - मिसेस भिडे ), त्यांच्या मातोश्री सौ. प्रतिभाताई कुलकर्णी या देखील उपस्थित होत्या. सोनालिकाजींच्या हस्ते हिरकणी सौ. गीतांजली योगेश वाणी यांना साहित्यिक क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानासाठी शुभंकरोती राज्यस्तरीय समर्थ नारी सन्मानाने सन्मानित करण्यात आले. समाजातील विविध स्तरातून त्यांना शुभेच्छा दिल्या जातं आहेत.

## पंकजा मुंडे यांना ज्योतीताई मेटेच पराभूत करु शकता:- राजेंद्र आमटे



**वादळवार्ता/बीड**
बीड लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार पंकजा मुंडे यांना मात फक्त स्वर्गीय दिवंगत लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या पत्नी उच्च शिक्षित प्रशासकीय सेवेचा दांडगा अभ्यास असणाऱ्या ज्योतीताई मेटे याच पंकजा मुंडे यांना मात देऊ शकता असा विश्वास बीड जिल्हा मधील सर्व सामान्य माणूस व्यक्त करत आहे.

दर पाच वर्षांतून निवडणूक आली की हाबुक ठोकून बाहेर एरवी शेतकरी अडचणीत असताना कोठे जातात. निवडणूक आली की शेतकरी पुत्र, मग पाच वर्षे कोठे गायब असतात. दोन ते तीन कारखान्याचा मालक शेतकरी पुत्र कसा? बीड जिल्हा मध्ये अवकाळी पाऊस, गारपीट, दुष्काळ या वेळेस शेतकरी पुत्र कोठे गायब असतात हे कळत नाही?.

बीड जिल्हा मध्ये रेल्वे पाच वर्षांनी रेल्वेत बसून येऊन लोकसभेची उमेदवारी अर्ज दाखल करू म्हणाऱ्या भारतीय जनता पक्षाच्या खासदाराला साधा खासदार निधी सुधा खर्च करता येऊ नये या पेक्षा अधिक दुर्दैव कोणते ?

बीड लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार पंकजा मुंडे यांना फक्त आणि फक्त स्वर्गीय दिवंगत लोकनेते विनायकराव मेटे यांच्या पत्नी ज्योतीताई मेटे याच मात देऊ पराभूत करू शकता असे प्रसिद्ध पत्रक शिवसंग्राम शेतकरी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे यांच्या वतीने करण्यात येते आहे



## कै. सुभाष बाबुराव धस यांच्या प्रथम वर्ष श्राद्ध निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन.

**वादळवार्ता/केज**
सांगवी (सा.) येथील कै. सुभाष बाबुराव धस यांच्या प्रथम वर्ष श्राद्ध निमित्त मौजे सांगवी येथे संगीतमय श्रीमदभागवत कथा ज्ञान यज्ञ व शिवलीला अमृत पारायण सोहळ्याचे आयोजन केले असून या कार्यक्रमाचे कथा प्रवक्ते आप्पासाहेब महाराज चौरे (संस्थापक अध्यक्ष चंद्रशेखर बाबा संस्थान चौंडी ता. धारूर) हे आहेत तसेच शिवलीलामृत व श्रीमद् भगवद्गीता पारायण व्यासपीठ चालक रामकृष्ण महाराज शास्त्री (आळंदी देवाची) हे आहेत. या कार्यक्रमांमध्ये स.७ते९,१०ते १ श्रीमद् भागवत कथा, ३ते५ तिला शिवलीला अमृत कथा वाचन, ५ते६ मुक्ताई महिला भजनी मंडळ यांचा हरिपाठ, तर सांगवी (सा) येथील भजनी मंडळाचा हरिजागर होईल तसेच ह.भ.प. महारुद्र महाराज खाडे यांचे दि.१६ एप्रिल २०२४ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत हरी किर्तन होईल. कार्यक्रमाचे मार्गदर्शक ह.भ.प.रामकृष्ण महाराज शास्त्री आळंदीकर, ह. भ .प. सखाराम महाराज सांगवीकर, ह भ प महादेव केदार महाराज सांगवीकर, हे असून या कार्यक्रमाचा पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक अविनाश सुभाष धस , सुमनबाई सुभाष धस यांनी केले आहे.

## माढा लोकसभेत महायुतीत बंडाचे चिन्ह, तर वंचितने आणला ट्विस्ट

**वादळवार्ता/माढा**
माढ्यात महायुतीत निर्माण झालेल्या वादाने भाजपचं टेन्शन वाढलं आहे. भाजपनं रणजित सिंह निंबाळकरांना पुन्हा उमेदवारी दिल्यानं धैर्यशील मोहितेंनी भाजपचा राजीनामा दिला. ते शरद पवार गटात जाणार आहेत. रणजित सिंह मोहितेंही राजीनामा देण्याच्या तयारीत असल्याचं कळतंय. तर अजित पवार गटाचे नेते रामराजे निंबाळकरांचाही भाजपच्या उमेदवाराला विरोध आहे.निंबाळकरांना विरोध



माढ्यातून भाजपचे उमेदवार रणजित सिंह निंबाळकरांना विरोध करत धैर्यशील मोहिते पाटलांनी भाजपचा राजीनामा दिला. आता शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून धैर्यशील मोहितेच उमेदवार राहणार हे निश्चित झाल्यानं प्रदेशाध्यक्ष बावनकुळेंनी त्यांचा राजीनामा मान्य केला. धैर्यशील मोहितेंनी कालच पुण्यात पवारांची भेट घेतली. आता ते 14 तारखेला शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करणार आहेत आणि 16 तारखेला अर्ज भरणार आहेत.

माढ्यात आता स्पष्ट झालं की भाजपच्या रणजित सिंह निंबाळकरांविरोधात शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून धैर्यशील मोहितेच असतील. माढ्यातून रणजित सिंह निंबाळकर भाजपचे विद्यमान खासदार आहेत. भाजपनं त्यांना पुन्हा तिकीट दिलं. मात्र उमेदवारी जाहीर होण्याच्याआधी पासूनच रणजित सिंहांच्या उमेदवारीला महायुतीतूनच विरोध होता. अखेर धैर्यशील मोहितेंनी बंडाचा झेंडा हाती घेतला.शरद पवार गटाच्या वाटेवर धैर्यशील मोहिते विजय सिंह मोहिते पाटलांचे पुतणे आहेत

संपादकीय

# पंजाबात प्रक्षोभक दंगे आणि मार्शल लॉ!

[जालियनवाला बाग हत्याकांड स्मृती.]

भारतभर या हत्याकांडाच्या तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. नोबेल पारितोषिक विजेते गुरू रविंद्रनाथ टागोर यांनी त्यांना इंग्रजांनी दिलेली “सर” ही पदवी परत केली. या हत्याकांडाचा बदला घेण्यासाठी अनेक क्रांतीकारक जन्माला आले. शहिद उधमसिंग- जे स्वतः या हत्याकांडामधे जखमी झाले होते, त्यांनी दि.१३ मार्च १९४० या दिवशी या हत्याकांडाचे उत्तर म्हणून मिशाएल ओ डायर- जो या हत्याकांडाचा सुत्रधार होता त्यांवर बंदुकितून गोळ्या झाडुन वध केला. सदर रोमांचक माहिती अलककार- श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरुजींच्या शब्दांत जरूर वाचाच... संपादक.

अमृतसर अखंड भारतातील पंजाब राज्यातील एक महत्त्वाचे शहर होते. दि.१० एप्रिल १९१९ रोजी सकाळी एक घोळका अमृतसरच्या डेप्युटी कमिशनरच्या घराकडे जात होता. कारण होते दोन प्रसिद्ध स्वातंत्र्यवीरांच्या सुटकेची मागणी. सत्यपाल आणि सैफुद्दीन किचलु असे दोन वीर ज्यांच्या विरुद्ध तडीपार करण्याचा आदेश जारी करण्यात आला होता. या घोळक्यावर सैन्याच्या एका तुकडीने बेछूट गोळीबार केला. त्याचे पडसाद त्याच दिवशी उमटले. ब्रिटिश सरकारच्या अस्तित्वाची जाणीव करून देणाऱ्या ईमारतींना आग लावण्यात आली. टाउन हॉल, दोन बँकाच्या इमारती, तारघर, रेल्वेचे गोदाम आदी आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. गुरखा रेजीमेंटने रेल्वे स्थानकाचा बचाव केला. रेल्वे गोदामाच्या एका युरोपीयन रक्षकाला जोरदार मारहाण करण्यात आली. तीन बँक कर्मचारी आगीत ठार झाले, तर एका युरोपीयन नागरिकाचा रस्त्यात खून करण्यात आला. एका ब्रिटिश महिलेवर प्राणघातक हल्ला करण्यात आला, परंतु काही भारतीयांनी तिचे प्राण वाचविले. दिवसभर हे थैमान चालू होतेच. ब्रिटिश सैन्याने दिवसभरात केलेल्या गोळीबारात ८-२० स्वातंत्र्य सैनिक धारातीर्थी पडले. या नंतरचे दोन दिवस अमृतसर शांत होते, पण पंजाबमधील इतर भागात मात्र हिंसा चालू होतीच. रेल्वेचे रूळ उखडण्यात आले, तारघर, डाकघर, सरकारी ईमारतींना आगी लावण्यात आल्या, ३ युरोपीयन नागरिक मारण्यात आले. या प्रक्षोभक दंग्यांमुळे अखेर १३ एप्रिल रोजी पंजाबमध्ये मार्शल लॉ जारी करण्यात आला.

दि.१३ एप्रिल १९१९ या दिवशी इंग्रजांच्या भारतावरील राजवटीत ब्रिगेडियर-जनरल रेजिनाल्ड डायर याने अमृतसर येथील जालियनवाला बाग या ठिकाणी हे हत्याकांड घडवून आणले. योगायोग असा की १३ एप्रिलला पंजाबी जनतेचा प्रिय सण बैसाखी सुद्धा होता. रिवाजानुसार हिंदू आणि शीख बांधव सण साजरा करण्यास एकत्र जमले. प्रचंड जनसमुदाय जालीयनवाला बागेत जमला होता. पण मार्शल लॉमुळे जमावबंदी लागू होती. पाच किंवा त्याहून जास्त जणांचा जमाव नियमबाह्य होता. जनरल डायर याच्या हुकुमावरून लष्कराने निशस्त्र लोकांच्या सभेवर रायफलींच्या सोळाशे फैरी झाडल्या. या सभेत स्त्रिया आणि पुरूषांसोबत लहान मुलांचाही समावेश होता. अधिकृत सूत्रांच्या हवाल्यानुसार या हत्याकांडामधे चारशे लोकांचा मृत्यू झाला. अनाधिकृत सूत्रांनुसार मृतांचा आकडा एक हजारहून अधिक आहे. भारतभर या हत्याकांडाच्या तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. नोबेल पारितोषिक विजेते गुरू रविंद्रनाथ टागोर यांनी त्यांना इंग्रजांनी दिलेली “सर” ही पदवी परत केली. या हत्याकांडाचा बदला घेण्यासाठी अनेक क्रांतीकारक जन्माला आले. शहिद उधमसिंग- जे स्वतः या हत्याकांडामधे जखमी झाले होते त्यांनी दि.१३ मार्च १९४० या दिवशी या हत्याकांडाचे उत्तर म्हणून मिशाएल ओ डायर- जो या हत्याकांडाचा सुत्रधार होता त्यांवर बंदुकितून गोळ्या झाडुन वध केला.

दि.२० जुलै १९०५ रोजी सरकारने बंगालची फाळणी करण्याचा निर्णय जाहीर केला आणि ठिणगी पडली. सरकारचा दावा असा होता, की प्रशासकीय विचारांतून हा निर्णय घेण्यात आला आहे. पण त्यामागे राष्ट्रवादी विचारांच्या बंग जनतेची फाळणी करण्याचा हेतू आहे, हे जनतेने ओळखले होते. १६ ऑक्टोबर रोजी कलकत्यात सार्वत्रिक हरताळ पाळण्यात आला व लोकांनी एक दिवस उपोषण केले. कलकत्याच्या अनेक रस्त्यांवरून मिरवणुका निघाल्या व संध्याकाळी विशाल सभा झाली. त्यात पन्नास हजार लोक हजर होते. बंगालच्या खेड्यापाड्यांतून आणि शहराशहरांतून सभा, मिरवणुका व निदर्शने यांचे पडसाद सतत उमटत होते. परकीय बनावटीच्या सर्व वस्तूंवर बहिष्कार व त्याऐवजी स्वदेशी वस्तूंचा वापर, हे या चळवळीचे सूत्र होते. अनेक ठिकाणी परदेशी कापडाच्या होळ्या पेटवण्यात आल्या आणि परदेशी कापड विकणाऱ्या दुकानांपुढे निदर्शने करण्यात आली. शाळा, कॉलेजांवर बहिष्कार, न्यायालये व सरकारी नोकऱ्यांचा त्याग, असे या असहकार आंदोलनाचे स्वरूप होते. मात्र कार्यक्रमांतील हा भाग परिणामकारकरीत्या अमलात येऊ शकला नाही. परकीय जोखडातून स्वातंत्र्य, अशीही नव्या नेतृत्वाने हाक दिली. त्याचाच एक परिणाम म्हणजे डिसेंबर १९०६ मधील काँग्रेस अधिवेशनाच्या अध्यक्षपदावरून बोलतांना दादाभाई नौरोजींनी स्पष्ट केले, की स्वराज्य हेच काँग्रेसचे उद्दिष्ट आहे. खेड्यातील आणि शहरातील सर्वसामान्य जनतेला या चळवळीत सहभागी होण्याची प्रेरणा देण्यात हे नवे नेतृत्व विलक्षण यशस्वी झाले. विशेषतः विद्यार्थी, महिला आणि शहरी भागातील कार्यकर्ते मोठ्या उत्साहाने या आंदोलनात सहभागी झाले. स्वदेशी आणि स्वराज्य या घोषणा लवकरच इतर प्रांतांतही प्रसृत झाल्या. परदेशी कापडांवरील बहिष्काराचे आंदोलन तर अखिल भारतीय पातळीवर संघटित करण्यात आले. समान सहानुभूती व समान राजकारण या बंधनांनी सारा देश आता एक होऊ लागला. सरकारने दडपशाहीनेच या आंदोलनास उत्तर दिले. सभांवर बंदी घालण्यात आली. वृत्तपत्रांचा आवाज दडपून टाकण्यात आला.

# शूद्रातिशूद्रांनो, सोडा अबोला! आज जय भीम बोला!!

(डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव.)

भारताच्या पावन भूमीवर अनेक महापुरुषांनी जन्म घेतला. ते देशासाठी व समाजासाठी अहोरात्र झटले. त्यांनी सामाजिक बांधिलकी व राष्ट्रनिष्ठा जोपासली. त्यांचा सेवेचा वारसा आजही देशवासियांसाठी आदर्श, मार्गदर्शक व दिशा दर्शक ठरत आहे. अशा या थोर महापुरुषात विश्वरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव सर्वात प्रथम उच्चारावे लागेल. त्यांच्या जयंतीनिमित्त श्री. एन. के. कुमार गुरूजींचा हा लेख... संपादक.

डॉ.बाबासाहेब उर्फ भीमराव रामजी आंबेडकर म्हणजे अष्टपैलू व्यक्तीमत्व होते. त्यांना प्रत्येक क्षेत्राचे परिपूर्ण ज्ञान व माहिती होती. सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक धार्मिक, पत्रकारिता, कायदे अशा विविध क्षेत्रात आपल्या अमोघ वक्तृत्वाने व कुशल नेतृत्वाने त्यांनी दीन, दलितांच्या, श्रमिकांच्या विस्थापितांच्या, शोषितांच्या अंधकारमय जीवनाला प्रज्ञेचा संदेश दिला. गलितगात्र झालेल्या मनामनांतून बहुजन समाजक्रांतीचे स्फुलींग चेतविले. त्यांनी मुर्दाड झालेल्या समाजाला आपल्या हक्काप्रती जागृत केले. बाबासाहेब म्हणजे प्रेरक, उद्धारक व तारक शक्ती होय. ते नुसते पुस्तकी पंडित नव्हते तर त्यांनी आपल्या आयुष्यात आचार आणि विचार यांची सांगड घातली आणि आपल्या तत्वज्ञानाला कृतीची जोड दिली. त्यांनी मानव मात्रांच्या जीवनातील दुःख, दारिद्रय आणि क्लेश दूर करण्यासाठी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपले पूरे ज्ञान माहिती व बळ लावले. रंजल्या गांजल्या जनतेच्या तसेच स्त्रीवर्गाच्या, शेतकरी-मजूर वर्गाच्या आणि पददलितांच्या उद्धारार्थ आपले प्राण पणाला लावून समतेची मंगलवाट दाखवली. मानवतेची दिव्य ज्योत निर्माण करते ती व्यक्ती केवळ वंदनीयच नव्हे तर ती व्यक्ती प्रेरक, उद्धारक व तारक शक्ती ठरते.


भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार तथा भारताच्या राष्ट्रीय ग्रंथ- संविधानाचे ग्रंथकार विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर होत. त्यांचा जन्म वडील रामजी व माता भीमाबाई यांच्या पोटी दि.१४ एप्रिल १८९१ रोजी झाला. बाल भीमावर चांगले संस्कार व्हावेत म्हणून ते दांपत्य दक्ष असत. स्वतःसह भीमरावांना वाचनाची खुप आवड असल्यामुळे घरात ग्रंथसंग्रह हा होताच. वडील रामजी हे मुलांनाही चांगली पुस्तके वाचावयास आणून देत असत. म्हणून बाबासाहेबांच्या आयुष्याच्या अंतिम क्षणापावेतो वाचनाची व अभ्यासपूर्ण चिंतनाची सवय त्यांच्या ठायी आढळते. जगद्गुरू संत तुकारामजी व संतशिरोमणी कबीर हे बाबासाहेबांच्या भावी आयुष्यात अभ्यासाचे विषय झालेले दिसतात.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सत्याच्या मार्गावर चालणारे खरे मार्गदर्शक होते. भ्रष्टाचार, अनीती, अत्याचार, अन्याय यांना त्यांचा प्रखर विरोध होता. जातीभेदाच्या ते विरोधात होते. जातीभेद म्हणजे समाजाला लागलेली किड ते मानत असत. ही सामाजिक किड नष्ट केल्याशिवाय बहुजन समाज एकसंघ होणार नाही, असे ते समजत. डॉ.बाबासाहेब म्हणजे तळागळातील लोकांना बौद्धिक व समाजिक गुलामगिरीतून मुक्त करून त्यांना मंत्र देणारे एक पथदर्शक होते. शिकल्याशिवाय आपल्यावरील न्याय, अन्याय, आपले हक्क हे आपल्याला कळत नाही, अशा प्रकारे त्यांनी समाजात सामाजिक क्रांतीचे रणशिंगच फुंकले. स्त्रियांना पुरुषांप्रमाणे समान हक्क मिळावेत यासाठी त्यांनी अनेक चळवळी केल्या. स्त्रियांची गुलामगिरीही त्यांनी दूर केली. इ.स.१९२७ ते १९५६पर्यंतच्या काळात त्यांनी भारतीय स्त्रीचा सामाजिक, कायदेशीर आणि राजकीय दर्जा वाढावा म्हणून सतत प्रयत्न केले. सन १९४२ साली भरलेल्या नागपूर येथील परिषदेत त्यांनी महिलांना सांगितले की, स्वच्छता पाळा. सर्व दुर्गुणांपासून दूर रहा. मुलामुलींना शिक्षण अवश्यच द्या. त्यांना महत्वाकांक्षी बनवा. त्यांचा न्यूनगंड दूर करा, अशा महत्वपूर्ण उपदेशांचे डोळ्यांत झणझणीत अंजन घातले. दलितांना त्यांचे हक्क मिळावे यासाठी त्यांनी त्यांच्या हक्कासाठी लढा दिला. श्रमजीवींसाठीही ते खंबीरपणे उभे राहिले. दलितांना मानाचे जीवन जगता यावे, म्हणून ते आजीवन सातत्याने संघर्ष करीत राहीले. केवळ दलितासाठीच नव्हे, तर शेतकरी, शेतमजूर, मजूर आणि कामगार आदींच्या प्रश्नासंबंधी जोरदार लढा दिला.

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी शस्त्र आहे. शिक्षणाने माणसाला आपले कर्तव्य व हक्कांची जाणीव होते. समाजातील अस्पृश्य समाजाला स्वत्वाची जाणीव व्हावी, यासाठी त्यांनी शिक्षणाचे महत्व समाजात विशद केले. ‘‘शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. ते जो माणूस प्राशन करेल तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही,’’ असे ते समाज बांधवांना सांगत. प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया आहे, म्हणून हे शिक्षण अतिशय दर्जेदार व गुणवत्तेचे असावे असे सांगत. ‘‘प्राथमिक शिक्षणाचे ध्येय असे असले पाहिजे की, मुलगा किंवा मुलगी एकदा शाळेत दाखल झाले की, ते पूर्णपणे सुशिक्षित, माहितीपूर्ण व गुणवत्ता प्राप्त करूनच बाहेर पडावेत. शासनाने यासाठी लक्ष द्यायला हवे. त्यांचे म्हणणे हाते की, समाजाच्या सर्व थरापर्यंत शिक्षण गेले पाहिजे. शिक्षण प्राप्त झाल्याने व्यक्ती बौद्धिकदृष्ट्या सशक्त होतो. व्यक्तीला चांगले आणि वाईट यातील फरक समजायला लागतो. प्रज्ञा, शील आणि करुणा हे गुण प्रत्येकाच्या अंगी आणण्यासाठी शिक्षणाची गरज त्यांनी प्रतिपादन केलेली आहे. शाळेत मुलांना केवळ बाराखडी शिकवू नये तर मुलांची मने सुसंस्कृत व गुणवत्तामय बनवावी. समाज हितार्थ या ज्ञानप्राप्त मुलांनी आपली सामाजिक बांधिलकीची कर्तव्ये योग्य व समर्थपणे पार पाडावीत असे शिक्षण असावे. शाळा म्हणजे उत्तम नागरिक व कर्तव्यदक्ष नागरिक बनविणारे कारखाने आहेत. याचे भान या प्रक्रियेत भाग घेणाऱ्यांनी ध्यानी घ्यावे. पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापन इ.स.१९४६ साली करून त्यांनी मुंबइला सिद्धार्थ कॉलेज व औरंगाबादला मिलींद महाविद्यालय सुरू केले. राष्ट्रहीत व समाजहीताचे भान ठेवणारेच खरे शिक्षण होय, असे ते मानत. डॉ.बाबासाहेबांच्या आचार विचारांत राष्ट्रप्रेम व राष्ट्रनिष्ठा भरलेली होती. डॉ.आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा करताच तत्कालीन राष्ट्रीय नेते मंडळी घाबरली. त्यांना वाटले, डॉ.आंबेडकर आता देश सोडून जाणार की काय? परंतु या महामानवांनी निक्षून सांगितले, ‘‘आम्ही या भारत देशाची संतान आहोत. आम्हाला राष्ट्रीयत्वाची जाणीव आहेच. राष्ट्रावर संकट आल्यास प्राण पणाला लावून देशाचे रक्षण केले व पुढेही करूच!’’ यात डॉ.आंबेडकरांची प्रखर राष्ट्रनिष्ठा सामावलेली दिसून येते.

अशा या महामानवाचे महान कार्य म्हणजे देशासाठी व बहुजनवर्गाच्या समाजासाठीचे सामाजिक बांधिलकीचे कर्तव्य होय. डॉ.बाबासाहेब आंबेडकर या विश्वाला मिळालेली महानतम सर्वोत्तम देणगी होय. अशा या महामानवाचे दि.६ डिसेंबर १९५६ रोजी महापरिनिर्वाण झाले. त्यांनी आपल्या कार्याचा ठसा आमच्यासाठी मागे उमटवून ठेवला. नमो बुद्धाय, जय भीम! !! जयंतीनिमित्त विश्ववंद्य महामानवास विनम्र अभिवादन !!

**श्री. एन. के. कुमार गुरूजी.**



# पैसे साधण्याचे नवे आयोजन, साहित्य संमेलन!

अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद अन्वये छत्रपती शिवाजी महाराज साहित्य संमेलनाचे आयोजन हे पहिल्यांदाच 24/02/2016 ला केले गेले होते. या वर्षीचे हे ८वे संमेलन असून 9 जून 2024 ला रायगड येथे आयोजित केले गेले आहे. माहितीनुसार, या संमेलनामध्ये फक्त 60 कवी, कवयित्रींना सहभाग घेता घेईल. पण आयोजकांनी जाहीर केलेली सम्मेलन वर्गणी ही 750 रू. इतकी आहे. सामान्यतः बाहेरील कवी रायगडला जाण्या-येण्या साठीचा खर्च एकूण ३००० आणि त्यात दोन दिवसाची मजुरी १००० रुपये तरी कामाचा नुकसान होतो , आणि ७५० रूपये जोडले तर ४७५० होतात. जवळ जवळ एक कविता सादर करण्यासाठी ते ४७५० रुपयांचा खर्च करावा लागतो. त्यातही कविता ऐकण्यासाठी रसिक श्रोतेही उपस्थित नसतात. फक्त कवी मंडळच असतो. म्हणजे आपल्याच पैशातून १०० रुपयाची ट्रॉफी ३० रुपयाचे प्रमाणपत्र दिले जाते.. ते ही आपल्याच पैशातून!

आज महागाई वाढलेली आहे पण कार्यक्रमाचा काहीसा खर्च हा समितीने भरावा व संमेलन हे अल्प शुल्क २०० रुपया पर्यंतच असावं. जेणेकरून संमेलनाचा खर्च हा मध्यस्थ होईल. कवीला त्याची काव्यप्रतिभा सादर करण्यासाठी एवढा खर्च म्हणजे आश्चर्यच आहे. शेवटी असेच म्हणता येईल की, कविसंमेलन हे कवीच्या कौशल्याला वाव देण्यासाठी नव्हे; तर पैसे कमविण्यासाठी घेतल्या जात आहेत.

जर असेच होत गेले तर किती तरी जुन्या, नव्या व खऱ्या कलावंतांना झुगारल्या जाईल. यावर आयोजकांनी स्वतः विचार करायला हवा व तेवढेच संमेलन वर्गणी कमी करावी.. जेणेकरून कमी व मध्यम उत्पन्न असलेल्या कवी वर्गाला अशा भव्य दिव्य मराठी साहित्य संमेलनात झळकता येईल व आपली काव्यप्रतिभा दाखवता येईल. हे प्रत्येक साहित्यिकाने विचारात घ्यावे अन्यथा अशा महागड्या संमेलनाला जाणे टाळावे.

**साहित्यिक / लेखक / समीक्षक शब्दशृंगार**
**विशाल पाटील वेरूळकर**

# एकता सेवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून गुढीपाडवा निमित्त मंडळांना साहित्य संच भेट



**दैनिक वादळ वार्ता**
**पुणे पंकज भंडारी**

एकता सेवा प्रतिष्ठानच्या वतीने गुलटेकडी भागातील अनेक हिन्दु मंडळाना आमच्या सर्वांच्या संकल्पनेतून गुढीपाडव्याच्या पुर्वसंध्याला काल सायंकाळी गुढी पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर परमपूज्य भगवा ध्वज व गुडी, गाठ्याचा हार पुजा साहित्य संच भेट देण्यात आले हिंदू धर्माचे पावित्र हिंदू सणांचे महत्त्व आणि अनेक वर्षाची प्राचीन हिन्दु परंपरा सर्व मंडळांनी जपावी व आनंदाने भगवा ध्वज आपल्या मंदीराच्या ,मंडळाच्या समोर डोलात फडकावा हाच हेतु साध्य करण्यासाठी प्रभागातील चाळीस मंडळांना भेट देण्यात आली प्रभागातील गणेश मंडळांना व सामाजिक संस्थांना स्वता उपस्थित राहत कार्यक्रम करण्यात आला सदर उपक्रमास अनेक हिंदू सामाजिक कार्यकर्त्यांनी भेट देत सदर उपक्रमाचे कौतुक केले यावेळी एकता सेवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष. गणेश शेरला, डॉ प्रसाद खंडागळे, चेतन चावीर, राहुल लांढे, उमेश शिंदे, योगेश पवार,सौरभ बारटक्के, संग्राम होनराव ,राहुल गुंड, अरूण शिरोळे सचिन डोंगरे, नितीन पाटेकर, पुष्पक पारवे,महेश साळुंखे, रूपेश राजभर , अविनाश सर्वगौड, रोहीत कोंढाळ, हेमंत जगताप, नझीर शेख,संतोष मोरे आदी उपस्थित होते. गुलटेकडी सॅलसबरीपार्क महर्षिनगर, मुकुंद नगर इंदिरानगर भागातील अनेक मंडळांना भेट देत आनंदी व भक्तिमय वातावरणात कार्यक्रम संपन्न झाला.

# बीड जिल्ह्यात अवकाळी पावसाचे थैमान; नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी - बजरंग सोनवणे



**वादळवार्ता/बीड**

जिल्ह्यात मागील दोन-तीन दिवसांपासून अवकाळी पावसाने थैमान घातले आहे. त्यातच गुरूवारी (दि.११) रोजी दुपारी अचानक वादळ-वारा व मेघगर्जनेसह आलेल्या अवकाळी पाऊस व गारांच्या जोराच्या माऱ्याने शेतकऱ्यांच्या फळबागा, भाजीपाला व आंबा या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. त्यामुळे अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई देण्याची मागणी बजरंग सोनवणे यांनी केली आहे.

मागील पावसाळ्यात जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात सरासरीच्या तुलनेत अत्यल्प पाऊस झाल्याने खरीप-रब्बी पिकांच्या उत्पादनात घट होऊन शेतकऱ्यांचे मोठे अर्थिक नुकसान झाले आहे. सध्या पशूधनाच्या चारा-पाण्याने शेतकरी त्रस्त झाले आहेत. त्यातच मागील दोन-तीन दिवसांपासून अवकाळी पावसाने संपूर्ण जिल्ह्याला झोडपून काढले आहे. गुरुवारी दुपारी जोरदार वारा व मेघगर्जनेसह झालेल्या पावसाने शेतकऱ्यांच्या फळबागा, भाजीपाला व आंबा या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अगोदरच अर्थिक अडचणींवर मात करणाऱ्या शेतकऱ्यांचे अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीने कंबरडेच मोडले आहे. अवकाळी पावसाने झालेल्या शेतकऱ्यांच्या अर्थिक नुकसानीची माहिती प्रशासनाला फोनवरून कळविली आहे. त्यामुळे प्रशासनाने अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून अगोदरच दुष्काळी परिस्थितने होरपळलेल्या शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई देण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष तथा महाविकास आघाडीचे बीड लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी जिल्हा प्रशासनाकडे केली आहे.

- ऋतु वसंताचा

-----------------------------------

वसंत ऋतूस म्हणती ऋतुराज सारे
आगमन होता अवनीवर याचे
निसर्ग रूप बदलूनी जाते अवघे
वसंतवैभवे दिपुनी जाती सारे ।। १ ।।

शिशिराच्या पानगळीने रुक्ष झाला
परिसर भोवतालिचा हो हा सारा
उजाड झाले होते डोंगरमाथे अन
रानोमाळ ही रखरखीत सारे ।।२ ।।

चैत्र -पालवी हा शुभ -संकेत जणू
वसंत -नवलाईचा ,नव-उन्मेशाचा
धरतीस खुलवणाऱ्या नव -बहराचा
सुंदर -बहारीचा ऋतू वसंताचा ।।३ ।।

-अरुण वि.देशपांडे -पुणे.
9850177342

------------------------------------------

# घोसला गावात वादळाचा तडाखा-पन्नास घरांवरील पत्रे उडाली-शेती पंपाचे रोहित्र हवेत घोसल्यातील घटना

**वादळवार्ता/सोयगाव**

अवकाळीच्या पावसासह वादळी वाऱ्याने सलग दुसऱ्या दिवशीही शुक्रवारी (ता.१२) सायंकाळी चार वाजता तडाखा दिला असून घोसला गावातील पन्नास घरांवरील पत्रे चक्क दहा मिनिटे हवेत असल्याचा थरार वादळाचा तडाख्यात पहावयास मिळाला होता दरम्यान एकीकडे गावातील पत्रे हवेत उडत असताना दुसरीकडे शेती शिवारातील शेती पंपाचे रोहित्रच हवेत उडाले आहे शुक्रवारी झालेल्या अवकाळी व वादळाच्या तडाख्यात घोसला गावात प्रचंड नुकसान झाले आहे तालुका प्रशासनाने अद्यापही पंचनामा केला नव्हता

सोयगाव शहर वगळता शुक्रवारी सायंकाळी चार वाजता निम्म्या तालुक्यात अवकाळी पावसासह वादळाचा फटका बसला आहे यामध्ये सर्वाधिक घोसला गावात नुकसान झाले असून पन्नास घरांवरील पत्रे उडाली आहे तर गावानजीक असलेल्या एका खासगी महाविद्यालयाच्या छताची पत्रे उडून भिंती कोसळल्याची घटना घडली आहे गावातील ज्ञानेश्वर डकले, गणेश गव्हांडे,प्रकाश गव्हांडे,सचिन युवरे,समाधान शिंदे,समाधान पाटील,विष्णू पाटील,दिगंबर युवरे,श्रावण युवरे,सुपडू पटेल, बंडू चव्हाण, बापू चव्हाण, एकनाथ



मातेरे,भगवान पाटील,लक्ष्मण हरणे, दिलीप माळी,रामभाऊ माळी,आदींची घरांची पत्रे व शेतातील शेड आदी उडाली आहे यामध्ये चाऱ्याची नुकसान झाले आहे तर सुवर्णा पाटील यांची गट क्र-१६६ मधील तीन एकर वरील ज्वारी आडवी झाली आहे दरम्यान घोसला पाठोपाठ निमखेडी, उमर विहिरे, कवली, बहुलखेडा, निंबायती या गावातही किरकोळ घरांची पत्रे उडाली आहे दरम्यान जरंडी पासून ते घोसला गावापर्यंत अवकाळीच्या पावसाचा जोर अधिक होता घोसला गावावर वीस मिनिटे वादळ होते त्यामुळे पन्नास घरांवरील पत्रे हवेत असल्याचा थरार ग्रामस्थांनी डोळ्यांनी पहिला होता अवकाळीच्या पावसात पुन्हा ज्वारी,बाजरी चे नुकसान झाले आहे त्यामुळे रब्बी व उन्हाळी हंगाम वादळाचा व अवकाळीच्या

----झाडे उन्मळून पडली घोसला, निमखेडी, निंबायती,बहुलखेडा, आदी भागात वादळाचा तडाख्यात झाडे उन्मळून पडली असून वादळाचा तडाख्याने घोसला परिसर भेदरून गेला होता.......

तडाख्यात उध्वस्त झाले आहे सोयगाव-बनोटी रस्त्यावर उमर विहिरे गावाजवळ झाडे आडवी पडून वाहतूक विस्कळीत झाली आहे सायंकाळी उशिरापर्यंत वाहतूक ठप्प होती.. तालुका प्रशासनाने तातडीने नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी होत आहे....

# हरी नारायण आष्टा येथे बजरंग सोनवणेंची काढली सजविलेल्या बैलगाडीतून मिरवणूक

## तालुक्यातील विविध गावात कॉर्नर बैठका घेत साधला संवाद



**वादळवार्ता/आष्टी**

आष्टी तालुक्यातील हरीनारायण आष्टा येथे राष्ट्रवादी काँग्रेस व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे हे गाठीभेटीसाठी गेले असता गावकऱ्यांनी सजविलेल्या बैलगाडीतून वाजत - गाजत गावातून मिरवणूक काढून त्यांचे जंगी स्वागत केले.

बीड लोकसभा निवडणुकीचे राष्ट्रवादी काँग्रेस, इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे हे प्रचारनिमित्त शुक्रवारी आष्टी तालुक्यात दौऱ्यावर होते. यावेळी माजी आमदार साहेबराव दरेकर, किशोर हंबर्डे, विधानसभा प्रमुख रामभाऊ खाडे, परमेश्वर शेळके, आपचे डॉ. नाथ, काँग्रेसचे रविदादा ढोबळे, सचिन वारूळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तालुक्यातील हरी नारायण आष्टा येथे बजरंग सोनवणे यांचे आगमन होताच गावकऱ्यांनी उत्स्फूर्तपणे त्यांची सजवलेल्या बैलगाडीतून ढोल ताशाच्या गजरात वाजत - गाजत व फटाक्यांची आतिषबाजी करीत गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी रस्त्यात उभ्या असलेल्या महिलांनी त्यांचे औक्षण करून त्यांना छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा भेट दिली.

उमेदवार बजरंग सोनवणे यांनी शुक्रवारी सकाळपासून तालुक्यातील चिंचपुर (रे), डोके वस्ती, मातोळी, आष्टा फाटा, जामगाव वस्ती, जामगाव, वाळूज टाकळसिंग, चिखली, वाकी, शिराळ, कानडी (बु), धीर्डी, निमगाव चोभा, काटवन वस्ती, रुईनालकोल, फत्तेवडगाव, पिंपरी (घु.) येथे भेटी देऊन मतदारांशी संवाद साधत कॉर्नर बैठका घेतल्या.

# गंगापूर-वैजापूर तालुक्यासाठी नांदूर मधमेश्वर प्रकल्पातून पाणी सोडा

गंगापूर-वैजापूर तालुक्यात अत्यल्प पर्जन्यवृष्टी अभावी पिण्याच्या पाण्याची फार भयावह परिस्थिती निर्माण झाली असून नागरिकांना पिण्याच्या पाण्याकरिता भटकंती करावी लागत आहे. त्यामुळे नांदूर मधमेश्वर पाटबंधारे प्रकल्पातून दोन्ही तालुक्यासाठी पाणी सोडावे अशी मागणी आमदार सतीश यांनी छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक यांच्याकडे आज (दि.१२) रोजी निवेदनाव्दारे केली आहे.आमदार सतीश चव्हाण यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गंगापूर, वैजापूर तालुक्यात पिण्याच्या पाण्यासाठी कायमस्वरूपी पाणीसाठा नागरिकांसमोर उपलब्ध नाही. तसेच विहीरीस पाणी नसल्याने टँकर सुरू केले तरी पिण्याचे पाणी मिळण्यास अडचण निर्माण होणार आहे. गंगापूर, वैजापूर तालुक्यासाठी नांदूर मधमेश्वर पाटबंधारे प्रकल्पातून पाणी सोडल्यास काही प्रमाणात पिण्याच्या पाण्याची अडचण दूर नसल्याने पाटबंधारे प्रकल्पात पाणीसाठा पिण्याचा पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. आज रोजी तालुक्यातील विहीरींच्या पाण्याने तळ गाठला आहे. गंगापूर, वैजापूर तालुक्यात कोणत्याही पाझर तलाव व होण्यास मदत होईल. त्यामुळे नागरिकांची पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेता नांदुर मधमेश्वर प्रकल्पातून तात्काळ पाणी सोडावे अशी मागणी आमदार सतीश चव्हाण यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामूहिक जयंती निमित्त सार्वजनिक जयंती उत्सव समिती मानवत येथे,दि.११ एप्रिल रोजी आयोजित कार्यक्रमामध्ये,अध्यक्ष नितीन गवळी आणि इतर मान्यवर यांच्या हस्ते विचारधारा ( सुरुवात वैचारिक क्रांतीची ) या प्रातिनिधिक कविता संग्रहाचे प्रकाशन पार पडले. ह्यावेळी प्रकशिका रोहिणी माया रामू वाघमारे, संकलक कृष्णा राजू भालेराव, कवी उध्दव परभणीकर आणि कवी गणेश शेळके हे उपस्थित होते.



शिव, फुले, शाहू, आंबेडकर आणि अण्णाभाऊ साठे ह्यांच्या विचारांना सामान्य माणसांपर्यंत पोहवण्यासाठी केलेला हा उपक्रम 'विचारधारा'. ह्या पुस्तकामध्ये महाराष्ट्रातील निवडक कवींच्या निवडक कविता

# बीड जिल्ह्यातील ओबीसी जनतेने ओबीसी बहुजन पार्टीच्या उमेदवाराच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहवे - प्रा.टी.पी.मुंडे

## यशवंत अण्णा गायके हे ओबीसी बहुजन पार्टीचे बीडचे उमेदवार म्हणून जाहीर!

## ओबीसी जागा हो यशवंत अण्णा यांना निवडून आणण्याचा धागा हो! असे केले आवाहन!

**वादळवार्ता/बीड**

ओबीसीच्या न्याय हक्कासाठी आरक्षणासाठी ओबीसी बहुजन पार्टी ची स्थापना झाली असून बीड येथून यशवंत अण्णा गायके यांची उमेदवारी जाहीर केली ओबीसी बहुजन पार्टीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रा.टी.पी.मुंडे सर यांनी बीड येथील नीलकमल हॉटेल येथे घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत उमेदवारी जाहीर केली. ओबीसी, व्हिजे एन टी, एससी एसटी विमुक्तभटके जाती जमाती बारा बलुतेदार,आलुतेदार यांनी ओबीसी बहुजन पार्टीच्या उमेदवाराच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून लोकसभेत पाठवावे. उठ ओबीसी जागा हो यशवंत अण्णा यांच्या विजयाचा धागा हो असे आवाहन बीड जिल्ह्यातील जनतेला त्यांनी केले.

ओबीसी बहुजन पार्टीने राज्यात १४ जागावर उमेदवार दिले असून सात जागांवर जाहीर पाठिंबा दिला आहे. बीडमध्ये यशवंत अण्णा यांच्या उमेदवारीची घोषणा केली. त्यांनी पत्रकारांच्या विविध प्रश्नांना दिलखुलासपणे उत्तरे दिली. बीड जिल्ह्यात मराठा समाजाच्या काही लोकांनी जाळपोळ केली या जाळपोळीमध्ये ओबीसी समाजाचे नेत्यांना टार्गेट करण्यात आले. आमदारांची घरी जाळण्यात आली. हॉटेल जाळण्यात आले. या जाळपोळीची पाहणी आमचे नेते माननीय छगनरावजी भुजबळ साहेब, ओबीसी बहुजन पार्टीचे अध्यक्ष प्रकाश अण्णा शेंडगे, उपाध्यक्ष प्रा.टी.पी. मुंडे सर यांनी केल्यानंतर अंबड मधून ओबीसीचा एल्गार पुकारला आणि ओबीसीच्या आरक्षणासाठी लढा उभारला. ओबीसी संकटात असताना, ओबीसीची २२ मेळावे झाले तरी जिल्ह्यातील ओबीसी नेते कुठे होते असा सवाल त्यांनी केला.

बीड जिल्हा हा ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून ओळख आहे. बीड जिल्ह्याच्या ऊसतोड कामगाराचा आणि ओबीसीचा गेल्या पंचवीस वर्षांमध्ये कसल्याही




प्रकारचा विकास झाला नाही त्यामुळे बीड जिल्ह्याची जनता ही ओबीसीच्या उमेदवारांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

एल्गार मेळाव्या मधून लोकांची मागणी होती की ओबीसीचा स्वतंत्र पक्ष असला पाहिजे आम्ही कोणाला मतदान करावे त्यामुळे या मागणीचा विचार करून ओबीसी बहुजन पार्टीची स्थापना करण्यात आली आहे. मराठा समाज जाणून बुजून ओबीसीच्या आरक्षणामध्ये घुसू पाहत आहे. बीड जिल्ह्यातील सामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी आमचा उमेदवार कटीबद्ध आहे त्यासाठी ओबीसीने एकत्र येण्याची गरज आहे त्यामुळे ओबीसीच्या उमेदवाराला साथ देऊन लोकसभेत पाठवा असे आवाहन त्यांनी जिल्ह्यातील जनतेला केले आहे.

यावेळी ओबीसी बहुजन पार्टीचे मराठवाडा अध्यक्ष भीमराव मुंडे, जिल्हाध्यक्ष विनायकराव गडदे, ओबीसी बहुजन पार्टीचे बीड जिल्ह्याचे उमेदवार यशवंत अण्णा गायके, परळी तालुका अध्यक्ष सूर्यकांत मुंडे, उपाध्यक्ष माणिकराव सलगर , डॉ.भगवानराव सरवदे आदी उपस्थित होते.

# खात्यावर होल्ड लावल्याने अनुदान अडकले; शेतकरी अडचणीत

**वादळवार्ता/परवेज पटेल**

राष्ट्रीयकृत बँकांनी अग्रीम विमा व अनुदानासाठी आलेली रक्कम शेतकऱ्यांची खाती होल्ड करून त्याद्वारे कर्ज वसुलीचा सपाटा लावल्याने शेतकऱ्यांच्या खात्यावर आलेले अनुदान अडकले आहे. यामुळे शेतकरी बांधव अडचणीत सापडले आहेत. एकीकडे दुष्काळाच्या झळा वाढत असताना शासनाने चाऱ्याची जिल्ह्याबाहेर वाहतूक बंद केली. त्यासोबत पिक विमा पोटी २५% अग्रीम व आठ हजार पाचशे रुपये प्रति हेक्टर प्रमाणे दुष्काळी अनुदान वाटप सुरू केले पण राष्ट्रीयकृत बँकांनी मात्र अग्रीम विमा व अनुदानासाठी आलेले रक्कम शेतकऱ्यांची खाती होल्ड करून त्याद्वारे कर्ज वसुलीचा सपाटा लावला आहे वास्तविक पाहता नैसर्गिक आपत्ती निवारणार्थ दिलेली रक्कम होल्ड करून कर्जाची वसुली करू नये असा शासनादेश आहे. तरीही बँक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अशा प्रकारे वसुली सुरू केल्याने शासनाने दुष्काळ निवारणार्थ दिलेल्या रकमेचा उद्देश



पूर्ण होत नाही. शेतकऱ्यांना दिलेली पीक विमा पोटी वा दुष्काळ निवारणासाठी दिलेल्या रकमेतून जनावरांना चारा, काही अंशी पाणी व कुटुंबासाठी ही रक्कम बँकेने होल्ड लावून वळवली तर हवालदिल शेतकरी वर्गासमोर अडचणी उभ्या राहणार आहेत. बँकांनी लावलेला होल्ड काढला तरच दुष्काळात होरपळणाऱ्या शेतकऱ्यांना काही अंशी दिलासा मिळणार आहे

## मराठवाड्याच्या मंदिर स्थापत्य इतिहासात उल्लेखनीय कलिंदेश्वर मंदिर होणार इतिहास जमा भुमाफिया व आधिका-यांची मिलिभगत :- डॉ.गणेश ढवळे

बीड:- बीड शहरातील फुलाई नगर येथील भगतसिंग विद्यालया जवळील बहामनी कालखंडातील प्राचीन कलिंदकन्या (बिंदुसरा) नदीच्या काठावरील कलिंदेश्वर हे शिव मंदिर बीड नव्हे तर मराठवाड्याच्या मंदिर स्थापत्य इतिहासातील उल्लेखनीय मंदिर असुन इतिहास अभ्यासकांच्या म्हणण्यानुसार कलिंदेश्वर मंदिर आणि कंकालेश्वर मंदिराचा परस्पर संबंध असुन सहाशे वर्षे कंकालेश्वर मंदिरात दर्शन मज्जाव असल्याने शिवभक्तांनी बहमनी काळातील आदिलशाहीच्या कालखंडात कलिंदेश्वर मंदिर उभारुन आराधना केली.या मंदिरातील अतिसुक्ष्म नक्षीकाम न ,कमलपुष्प शिल्पातील वैविध्य, द्विमितीय शिल्प, भौमितिक शिल्प शैलीतील स्तंभ व दोन स्तंभातील कमानी तसेच पशुपक्षी व निसर्ग शिल्प



मनमोहक असुन उठावदार शिल्पे असणारे आकाराने लहान परंतु सुबक असणारे ऐतिहासिक मंदिर मात्र आता भुमाफीया आणि आधिकारी यांच्या संगनमताने इतिहास जमा होणार आहे. भुमाफियांनी या मंदिराभोवती तटबंदी बांधलेली असुन पुरातत्व विभाग तसेच नगरपरीषदेची कोणतीही परवानगी न घेता बांधकाम सुरू करून जागा हडपण्यासाठी धडपड सुरू असुन याकडे सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर, रामनाथ खोड,वर्षा जगदाळे यांनी वारंवार विभागीय आयुक्त तसेच जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी नगरपरीषद बीड यांना वारंवार लेखी तक्रार तसेच आंदोलनानंतर सुद्धा जाणिवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत असल्याचे दिसून येत आहे .

## कवडगाव येथे घरावरील पत्रे उडून लाखो रुपयांचे नुकसान..



वडवणी तालुक्यातील कवडगाव येथे अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसामुळे नागरिकांच्या घरावरील पत्रे उडाल्यामुळे घरातील वस्तूंचे मोठ्या प्रमाणामध्ये नुस्कान झाले असून यामध्ये लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. सुदैवाने यात जीवित हानी झाली नाही.. प्रशासनाने या घटनेची पाहणी करून तात्काळ पंचनामे करत आर्थिक नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी कवडगाव येथील नागरिक करत आहेत..

## केज विधानसभा मतदारसंघाचे मतदान केंद्राध्यक्ष व इतर मतदान अधिकारी यांचे पहिले प्रशिक्षण संपन्न.

### निवडणुकी दरम्यान कर्मचाऱ्यांनी हायगय केल्यास शिक्षेस पात्र- जिल्हाधिकारी

**वादळवार्ता/केज**




लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत ३९ बीड लोकसभा मतदारसंघ मध्ये २३२ केज विधानसभा मतदारसंघाचे मतदान केंद्राध्यक्ष व इतर मतदान अधिकारी यांचे पहिले प्रशिक्षण आज दिनांक १२ एप्रिल २०२४ रोजी विठाई मंगल कार्यालय केज या ठिकाणी पार पडले. प्रशिक्षण एकूण दोन सत्र मध्ये घेण्यात आले. प्रशिक्षणास विशेष उपस्थिती माननीय जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांची लाभली. लोकशाही बळकट करण्यासाठी लोकशाहीचे कायदेमंडळ निवडण्यासाठी निवडणूक प्रक्रिया राबवली जाते हे एक राष्ट्रीय कर्तव्य असून यामध्ये सर्वच निवडणुकीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना विशेष महत्त्व आहे त्यामुळे त्यांनी व्यवस्थित प्रशिक्षण घेऊन निवडणुकीचे काम गांभीर्यपूर्वक करणे आवश्यक आहे. या कामी टाळाटाळ अथवा दुर्लक्ष केल्यास लोकप्रतिनिधी व अधिनियम १९५० व लोकप्रतिनिधी अधिनियम १९५१ नुसार संबंधित कर्मचारी कारवाईस पात्र असतील. केज विधानसभा मतदारसंघांतर्गत प्रशिक्षणास उपस्थित असणाऱ्या केंद्राध्यक्ष व इतर मतदान अधिकारी यांचे मनोबल वाढवण्यासाठी जिल्हाधिकारी महोदयांनी मार्गदर्शक सूचना केल्या. तसेच मतदानाची एकूण प्रक्रिया कशी असेल त्यासाठी कोणती पूर्वतयारी करणे आवश्यक आहे तसेच मतदानाच्या दिवशी जी तयारी करावयाची आहे त्याबाबतचे सखोल मार्गदर्शन सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी श्री दीपक वजाळे उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई यांनी केले याप्रसंगी अभिजीत जगताप तहसीलदार केज विलास तरंगे तहसीलदार अंबाजोगाई सर्व क्षेत्रीय अधिकारी मास्टर ट्रेनर नायब तहसीलदार महसूल विभागाचे सर्व कर्मचारी उपस्थित होते. प्रशिक्षणाच्या दरम्यान आरोग्य सेवेसाठी वैद्यकीय पथक तसेच गर्दी व्यवस्थापन तसेच मतदान यंत्रे सुरक्षितता व संरक्षणासाठी पुरेसा पोलीस बंदोबस्त तैनात होता. प्रशिक्षणामध्ये मतदान यंत्र हाताळणी करण्यासाठी स्वतंत्र कक्षाची स्थापना करण्यात आली होती . गैरहजर कर्मचाऱ्यांविरुद्ध लोकप्रतिनिधित्व अधिनियम चे कलम १३४ नुसार कार्यवाही प्रस्तावित होणार असल्याचे सांगण्यात आले.मतदान अधिकारी २१५४ नियुक्ती होती त्यापैकी २०८५ हजर होते ६९ गैरहजर होते.

# अवकाळीने झालेल्या नुकसानीचे त्वरित पंचनामे करण्याचे निर्देश संबंधित जिल्ह्यांना - धनंजय मुंडे

**वादळवार्ता/मुंबई**

आचार संहिता असल्याने मदत व पुनर्वसन विभागास मदत जाहीर करण्यास अडचणी, शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत होईल राज्याच्या अनेक भागात मागील दोन दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे विशेष करून आंब्यासह विविध फळपिकांचे नुकसान झाले असून, संबंधित जिल्हा प्रशासनास पंचनामे करण्याचे निर्देश मदत व पुनर्वसन विभागाने दिले आहेत. निर्धारित वेळेत पंचनामे पूर्ण करून मदतीसाठीचे अहवाल शासनाकडे सादर होतील. अशी माहिती राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी आज माध्यमांशी बोलताना दिली आहे. मदत व पुनवर्सन विभागास सध्या लोकसभा निवडणुकीच्या आचार संहितेमुळे मदत जाहीर करण्यास अडचणी व मर्यादा आहेत. मात्र तरीही प्रशासनाच्या वतीने शेतकऱ्यांना योग्य ती मदत करण्याची कार्यवाही केली जाईल, असे धनंजय मुंडे म्हणाले. दरम्यान यावेळी त्यांनी रमजान ईद तसेच महात्मा फुले जयंतीनिमित्त महाराष्ट्रातील जनतेस शुभेच्छाही दिल्या.





दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रक ग्_राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )